# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

दिनांक १३.०४.२०२६ सोमवार

**मा. न्यायालयातुन आरोपीला आजन्म कारावासाची शिक्षा :—**

दिनांक १३.०४.२०२६ रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायालय—३ तथा अति. सत्र न्यायाधिश, नागपुर श्री. आर.एम. मिश्रा साहेब यांनी त्यांचे कोर्टाचे केस क्र. ५९२/२०२४ मधील, पोलीस ठाणे हुडकेश्वर येथील अप. क्र. ४३४/२०२४ कलम ३०२ भा.दं.वि. या गुन्ह्यातील आरोपी अंकुश गणेश गाखरे वय ३३ वर्षे रा. प्लॉट क्र. ३०, सौभाग्य नगर, हुडकेश्वर, नागपूर याचेविरूध्द साक्षी पुराव्याअंती गुन्हा शाबीत झाल्याने, आरोपीस कलम ३०२ भा.दं.वि. अन्वये आजन्म सश्रम कारावासाची शिक्षा व २,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०६ महीने अतिरीक्त कारावासाची शिक्षा ठोठावली.

दिनांक ०७.०६.२०२४ चे २२.०० वा. ते दि. ०८.०६.२०२४ चे ००.३० वा. चे दरम्यान, फिर्यादीचा साळा नामे धवल पांडुरंग नाटकर, वय ३३ वर्षे, रा. चक्रपाणी नगर, विठोबा लॉन मागे, पिंपळा रोड, नागपुर हा फिर्यादीचे घरून जेवण करून आपले घरी जाताना, त्याचा परिचीत आरोपी नामे अंकुश गणेश गाखरे वय ३३ वर्षे, रा. सौभाग्य नगर, प्लॉट नं. ३०, हुडकेश्वर याला फिर्यादीचे साळ्याने शिवीगाळ केल्याने, आरोपीने दारूचे नशेत रागाचे भरात रस्त्यावरील कॉंक्रीटचे दगडाने फिर्यादीचे साळ्याचे डोक्यावर मारून त्यास जिवानिशी ठार केले होते. फिर्यादी सारंग रामकृष्ण रणदिवे, वय ३६ वर्षे, रा. प्लॉट नं. २६, सौभाग्य नगर, हुडकेश्वर रोड, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे आरोपीविरूध्द कलम ३०२ भा.द.वि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरोपीस दिनांक ०८.०६.२०२४ रोजी अटक करण्यात आली होती.

गुन्ह्याचे तत्कालीन तपासी अधिकारी सपोनि. श्री. जितेंद्र गाडगे यांनी मा. कोर्टात तपासाअंती दोषारोपपत्र सादर केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता म्हणून ॲड. श्री. अनवानी साहेब यांनी तर, आरोपीतर्फे ॲड. श्री. जलतारे साहेब यांनी काम पाहिले. सदर गुन्हयात कोर्ट पैरवी अधिकारी मनापोअं. सुनिता गोटमुकूलवार यांनी काम पाहिले.

(कामगिरी)

**१) गुन्हेशाखा युनिट क्र. ०३ पोलीसांची कामगीरी :— वाहन चोरी करणाऱ्या आरोपीस अटक, ०६ गुन्हे उघडकीस.**

दिनांक ०६.०४.२०२६ चे १९.०० वा. ते दिनांक ०७.०४.२६ चे ०७.०० वा. चे दरम्यान, फिर्यादी किरणकुमार घनश्याम शाहू वय २८ वर्ष रा. गरीब नवाज नगर, यशोधरानगर, नागपूर यांची पत्नी पोलीस ठाणे तहसील हद्दीत मेयो हॉस्पिटल, डिलीव्हरी वार्ड येथे दाखल असल्याने फिर्यादी यांनी त्यांची होन्डा शाईन गाडी क्र. एम.एच. ४९ एझेड ४५८२ किंमती २०,०००/—रू. ची ही दवाखानाचे पार्कीगमध्ये लॉक करून, पार्क करून पत्नीला भेटण्यास गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची दुचाकी चोरून नेली. फिर्यादी यांनी

दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे तहसील येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हयाचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ०३ चे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून, तसेच मिळालेल्या खात्रीशीर माहीती वरून आरोपी नामे लखपती बस्ताराम फेंडर वय ३१ वर्षे, रा. वाराशिवनी, बालाघाट, मध्यप्रदेश यास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, त्याने वर नमुद वाहन चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीस अधिक सखोल विचारपूस केली असता त्याने या गुन्हयाव्यतीरिक्त पोलीस ठाणे तहसील हद्यीतुन—०१, गणेशपेठ हद्यीतुन —०१, नागपूर रेल्वे पोलीस ठाणे हद्यीतुन —०१, गोंदीया शहर हद्यीतुन —०१, गोंदीया रेल्वे पोलीस ठाण हद्यीतुन—०२ असे एकुण ०६ वाहन चोरीचे गुन्हे केल्याचे सांगीतले. आरोपीस गुन्हयात अटक करून त्यांचे ताब्यातुन चोरी केलेले ०६ दुचाकी वाहने व इतर ०१ असे एकूण ०७ दुचाकी वाहने किंमती २,८०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कारवाईकामी तहसील पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी, सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. राहुल माकणीकर, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली पोनि. महेश सागडे व त्यांचे यांनी केली.




## २) तहसील पोलीसांची कामगिरी :— गांजा बाळगणाऱ्या आरोपीस अटक.

मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतुन **''ऑपरेशन थंडर — एकत्र येवुया, नशामुक्त समाज घडवुया''** मोहीमेअंतर्गत अंमली पदार्थ विक्री करणारे तथा जवळ बाळगणारे तसेच, अंमली पदार्थाचे सेवन करणारे गुन्हेगारांविरूध्द कारवाई सुरू आहेत.

दिनांक १२.०४.२०२६ चे २१.२५ वा. चे सुमारास, तहसील पोलीसांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, पोलीस ठाणे हद्दीत तकीया दिवाण शाह, काळया झेंडयाजवळ, पटेलचे घरी किरायाने राहणारा आरोपी नामे मोहम्मद इमरान मोहम्मद हारुण वय ३० वर्षे याचे राहते घरी पंचासमक्ष रेड कार्यवाही केली असता, त्याचे ताब्यात एकुण ५ प्लास्टीक बोरीमध्ये ५७ किलो ४७० ग्रॅम गांजा कि. १४,३६,७५०/— रू. चा मिळून आल्याने जप्त करण्यात आला. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता गांजा विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२०(ब),२(क) एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने आरोपीविरूध्द पोलीस ठाणे तहसील येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी, सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री राहूल मदने, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ३), मा. श्रीमती अनिता मोरे, सहा. पोलीस आयुक्त (कोतवाली विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. संजय मेंढे, दुपोनि राहूल वाढवे, पोउपनि. शेख रसूल, सफौ. राजेश ठाकूर, पोहवा. संजय शाहू, प्रदीप सोनटक्के, पोअं. पवन साखरकर, विनोद कातुरे, सुनिल सेलोकर, संदीप शिरफुले, फिरोज खान, महेंद्र सेलुकर व मपोअं. उषा यांनी केली.




**(अकस्मात मृत्यु)**

**<u>पोलीस ठाणे कळमणा</u> :—** दिनांक १२.०४.२०२६ चे १०.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे कळमणा हद्दीत, नागपूर—जबलपूर हायवे, आऊटर रिंग रोड, भोला ढाब्यासमोरील टायर पंक्चर दुकानाजवळ एक अनोळखी **इसम वय अंदाजे ४० वर्षे** वयाचे बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची अद्याप ओळख पटलेली नाही.

यាप्रकरणी फिर्यादी भोला अहमद अंसारी वय २७ वर्ष यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे कळमणा येथे मपोउपनि. प्रेरणा काळे ९९२११३६३१९ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**<u>१) पोलीस ठाणे पारडी</u> :—** कु. तन्नु तुकाराम शाहू वय १९ वर्षे, रा. दुर्गा माता मंदीरजवळ, पारडी, नागपूर ही दिनांक ०९.०४.२०२६ चे सकाळी ०८.०० वा. चे सुमारास पोलीस ठाणे पारडी हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. आजपावेतो घरी परत आली नाही. तिचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **<u>वर्णन</u>** रंग— सावळा, चेहरा—लांबट, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट २ इंच, केस— काळे, अंगात— जांभळया रंगाचा सलवार सुट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी/छत्तीसगढी बोलते. ओळखचिन्ह— डावे हातावर झाडाचे पानाचे चित्र गोंदलेले आहे.

**<u>२) पोलीस ठाणे इमामवाडा</u> :—** नयन अश्विन नाईक वय २२ वर्षे, रा. रामबाग, नागपूर हा दिनांक ०६.०४.२०२६ रोजी पोलीस ठाणे इमामवाडा हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेला. आजपावेतो घरी परत आला नाही. त्याचा शोध घेतला असता मिळून आला नाही. **<u>वर्णन</u>** रंग— गोरा, चेहरा—गोल, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट ३ इंच, केस— काळे, अंगात— हॉफ शर्ट व फुलपॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतो.

**<u>३) पोलीस ठाणे इमामवाडा</u> :—** प्रदीप काकाजी खापर्डे वय ४५ वर्षे, रा. इंदीरनगर, जाटतरोडी क्र. २, इमामवाडा, नागपूर हा दिनांक १०.०५.२०२१ पासून पोलीस ठाणे इमामवाडा हद्दीतून बेपत्ता आहे. आजपावेतो घरी परत आला नाही. त्याचा शोध घेतला असता मिळून आला नाही. **<u>वर्णन</u>** रंग— सावळा, चेहरा—गोल, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट ५ इंच, केस— काळे, अंगात— शर्ट व फुलपॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतो.



कु. तन्नु



नयन



प्रदीप

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपूर शहर.**